N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** वाडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0035 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/01/2024 04:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Date From (दिनांक पासून):** 30/01/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/01/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Time From (वेळेपासून):** 16:21 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 31/01/2024 **Time (वेळ):** 04:57 बजे

(c) **General Diary Reference, (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/01/2024 04:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** वाडा-भिवंडी रोड,हॉटेल कोकण किनारा व तलाठी सजा, कोने ,वाडा , 421303

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** हितेश मारूती गोतारणे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** मारूती गोतारणे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड **,**मतदाता कार्ड **,**पासपोर्ट**,** यूआईडी सं.**,** ड्राइविंग लाइसेंस**,** पॅन कार्ड **)**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गातेस बुद्रुक,वाडा,वाडा,पालघर,महाराष्ट्र,421303,भारत |
| 2 | स्थायी पता | गातेस बुद्रुक,वाडा,वाडा,पालघर,महाराष्ट्र,421303,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9130496001

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (**माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | किरण शंकर राठोड | | वडील का नाम : शंकर राठोड | 1. मंडळ अधिकारी कार्यालय,कोने ,वाडा ,वाडा,पालघर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | चैत्राली किशोर कुटे | | पती का नाम : किशोर कुटे | 1. तलाठी सजा,कोने ,वाडा ,वाडा, पालघर,महाराष्ट्र,भारत-421303 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (**तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे**):**

**9. Particulars of properties of interest (**संबंधीत मालमत्तेचा तपशील**):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यारा)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी हितेश मारूती गोतारणे, वय 32 वर्ष, धंदा. वर्कशॉप, रा.गातेस बुद्रुक, पो.कोने, ता.वाडा, जिल्हा पालघर, मोबाईल नं. 9130496001 असा असून समक्ष फिर्याद लिहुन देतो की, मी विरार येथे मोटार पंप रिपेअरींग चा व्यवसाय करतो तसेच आमची गातेस बुदुक, व मौजे कोने ता.वाडा, जिल्हा पालघर येथे वडीलोपार्जीत शेती असून सदरची शेती माझे वडील व काका करतात.

माझे वडील मारूती नाशिक गोतारणे यांनी अंदाजे 3 महीन्यापुर्वी तलाठी सजा कोने, ता.वाडा, जिल्हा पालघर यांच्या नावे मौजे गातेस बुद्रुक, ता.वाडा, जिल्हा पालघर येथील सर्व्हे नं. 12/1/1 मधील 7/12 उताऱ्यावर असलेल्या नावापैकी माझी आजी कै.गिरजाय नाशिक गोतारणे ही मयत झाल्याने तिचे नाव कमी करण्यासाठी व मौजे गातेस बुद्रुक, ता.वाडा, जिल्हा पालघर येथील सर्व्हे नं. 81/2 मधील 7/12 उताऱ्यावर असलेल्या माझे आजोबा कै.नाशिक शिवा पाटील (गोतारणे) हे मयत असल्याने त्यांचे नाव कमी करून त्या ठिकाणी त्यांच्या वारसांची नावे लावण्यासाठी केलेले असे दोन अर्ज मी तलाठी सजा कोने, ता.वाडा येथे दिलेले होते.

तसेच माझा चुलत भाऊ कपिल दिलीप गोतारणे यांनी अंदाजे 2 महीन्यापुर्वी तहसीलदार, तालुका वाडा यांच्या नावाने त्याचे मौजे गातेस बुद्रुक ता.वाडा येथील सर्व्हे नं. 1) 8/1, 2) 9/1, 3) 12/1/1 व मौजे कोने ता.वाडा येथील सर्व्हे नं. 1) 84/1, 2) 85/1/क, 3) 86 मधील 7/12 उताऱ्यावर कल्पेश असे नजर चुकीने लागलेले नाव बदलून त्याठिकाणी ''कपिल'' हे नाव नोंदविण्यासाठी केलेला अर्ज मी तहसील कार्यालय, वाडा येथे दिलेला होता.

तसेच माझी चुलत बहीण संजना संजय पाटील (लग्नापुर्वी-छाया दिलीप गोतारणे) हिने सुध्दा तहसीलदार, तालुका वाडा यांच्या नावे मौजे गातेस बुद्रुक ता.वाडा येथील सर्व्हे नं. 1) 8/1, 2) 9/1, 3) 12/1/1 व मौजे कोणे ता. वाडा येथील सर्व्हे नं. 1) 84/1, 2) 85/1/क, 3) 86 मधील 7/12 उताऱ्यावर लग्नापुर्वीचे छाया दिलीप गोतारणे असे असेलेले नाव बदलून त्याठिकाणी तिचे लग्नानंतरचे नाव ''संजना संजय पाटील'' असे नोंदविण्यासाठी केलेला अर्ज मी तहसील कार्यालय, वाडा येथे दिलेला होता.

तहसील कार्यालयात केलेले दोन्ही अर्ज पुढील कार्यवाही करून अहवाल सादर करण्यासाठी मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय कोने, ता.वाडा जिल्हा पालघर यांच्याकडे दिलेले आहेत.

वरील सर्व अर्जाच्या अनुशंगाने तलाठी कार्यालय, मंडळ अधिकारी कार्यालय, व तहसील कार्यालय, वाडा या कार्यालयात सदर प्रकरणांचा पाठपुरावा करून काम करून घेण्यासाठी माझे वडील, भाऊ कपिल, बहीण संजना यांनी मला तसे अधिकार पत्र दिलेले आहे. त्याप्रमाणे मी मागील 1 महीन्यांपासून मंडळ अधिकारी कार्यालय कोने येथील मंडळ अधिकारी श्री.किरण राठोड, व तलाठी सजा कोने येथील तलाठी श्रीमती चैत्राली कुटे यांना प्रत्यक्ष भेटून तसेच फोनवरून संपर्क साधून काम करण्यासाठी पाठपुरावा करीत होतो.

दिनांक 18/01/2024 रोजी मी मंडळ अधिकारी किरण राठोड यांना फोन केला असता त्यांनी मला दुस-या दिवषी दिनांक 19/01/2024 रोजी त्यांच्या ऑफीसला येवून भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी दिनांक 19/01/2024 रोजी मंडळ अधिकारी किरण राठोड यांच्या कार्यालयात जावून त्यांना भेटलो व त्यांना माझी कामे ब-याच दिवसांपासून पेंडींग असल्याचे सांगीतले. त्यावेळी त्यांनी सदरची कामे जर करून पाहीजे असतील, तर त्यांच्यासाठी 30,000/- रू व तलाठी चैत्राली कुटे यांच्याकरीता 5000/- रू दयावे लागतील तरच कामे लगेच पुर्ण होतील असे सांगीतले. परंतू मला त्यांना त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्याची इच्छा नव्हती. त्यानंतर मी घरी येवून मंडळ अधिकारी किरण राठोड यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत चर्चा केली त्यावेळी माझे वडीलांनीसुध्दा मंडळ अधिकारी किरण राठोड यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याचे सांगीतले.

त्यानंतर काही दिवस मी माझे कामात व्यस्त असल्याने मी दिनांक 29/01/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, पालघर कार्यालयाचे पोलीस निरीक्षक श्री.शिरीश चौधरी यांचेशी संपर्क साधून माझी तक्रार सांगून त्यांना मनोर येथे भेटण्याची विनंती केली होती. त्याप्रमाणे ते पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांचेसह मला मनोर येथील

मिलन हॉटेल च्या समोर भेटले. त्यावेळी मी त्यांना माझी तक्रार सांगून माझे स्वहस्ताक्षरात लिहलेली तक्रार दोन पंचांसमक्ष दिलेली आहे.
मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने अँन्टी करप्शन ब्युरो, पालघर कार्यालयाचे पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांनी नमुद दोन्ही लोकसेवक हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची दोन पंचासमक्ष दिनांक 29/01/2024 रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून माझेशी पंचांची व पडताळणी पथकाची ओळख करून दिली. तसेच करण्यात येणा-या पडताळणी कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली.
त्यानंतर मी पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांना सांगीतले की, मंडळ अधिकारी किरण राठोड यांना भेटण्यास जाण्यापुर्वी त्यांना फोन करून ते ऑफीसमध्ये आहेत का? याची खात्री करणे गरजेचे आहे. तसेच किरण राठोड हे व्हॉटस् अॅप द्वारे फोनवर बोलणी करतात. त्याप्रमाणे मी माझा मोबाईल नं. 9130496001 वरून मंडळ अधिकारी किरण राठोड यांचा मोबाईल नं. 8007502556 वर व्हॉटस् अॅप द्वारे फोन करून फोनचा लाउडस्पीकर चालू करून बोलणी केली. त्यावेळी मी त्यांना माझी चार कामे पेंडींग असल्याबाबत सांगीतले असता, त्यांनी मला उदया दिनांक 30/01/2024 रोजी त्यांच्या ऑफीसला भेटायला येण्यास सांगीतले. सदरचे फोनवरील संभाषण दोन पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर दिनांक 30/01/2024 रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक 30/01/2024 रोजी माझेकडील दुचाकी क्र. एम.एच. 04, एच.पी. 5738 वरून मौजे पोशेरी येथे येवून पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांची शासकीय वाहनात भेट घेतली. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांनी त्यांच्याकडील शासकीय वाहन क्र. एम.एच.48, सी.के. 6525 मधील पडताळणी पथकाची तसेच दुस-या शासकीय वाहन क्र. एम.सच.48 सी.सी. 3603 मधील पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी व पडताळणी पथकाशी माझी ओळख करून दिली. व पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्या.
त्यानंतर माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 1 यांच्यासह मी माझेकडील दुचाकीने मंडळ अधिकारी कार्यालय कोने, ता.वाडा येथे गेलो. त्यावेळी सदर ठिकाणी मंडळ अधिकारी किरण राठोड हे नव्हते म्हणून मी माझे वर नमुद मोबाईल नंबर वरून मंडळ अधिकारी किरण राठोड यांच्या वर नमुद मोबाईल नंबरवर व्हॉटस् अॅपद्वारे फोन करून फोनचा लाउडस्पीकर चालू ठेवून बोलणे केले. त्यावेळी त्यांनी एका तासाभरात येतो असे सांगीतले. म्हणून मी व पंच नं. 1 असे सदरच्या कार्यालयात थांबून राहीलो. त्यानंतर पुन्हा अंदाजे एक तासाने मी त्यांना पुन्हा व्हॉटस् अॅप द्वारे फोन केला असता, त्यांनी 15-20 मिनिटांत येतो असे सांगीतले. त्यानंतर थोडया वेळाने मंडळ अधिकारी किरण राठोड हे कार्यालयात आल्यानंतर मी त्यांच्याशी माझे पेंडींग कामाबाबत बोलणी केली असता, त्यांनी मला ''बाकीचे विषय ते झालं ना क्लीयर? असे बोलून लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना कोणता विषय सांगीतलेला असे म्हणून पस्तीस हजार खुप मोठी अमाउंट आहे असे बोललो. त्यावर ते '' हे बघ एवढी सात प्रकरण कोण करुन देत का?'' असे बोलले. तेंव्हा मी त्यांना साहेब सात प्रकरण मान्य आहेत पण आमच्यासाठी मोठी अमाउंट आहे ती, काय तरी करा त्याच्यात असे बोललो. त्यावर त्यांनी ''ते करु आपण शेवटी पाच कमी करु'' ''पाच कमी करुन फायनल करु'' असे बोलले त्यावर मी त्यांना म्हणजे तीस हजार असे विचारले असता, त्यांनी त्यास ''हां'' म्हणून होकार दिला. व माझं एकटयाचंच सांगितलं मॅडमचं मध्ये नको घालु असे बोलले. त्यावर मी त्यांना अॅडजेस्ट करा ना मॅडमचं असे बोललो. त्यावर त्यांनी ''मी सांगुन बघतो मॅडम ना'' असे म्हणून ''ऐकुन घे, मी सगळं सांगितलेलं ना त्याप्रमाणे फायनल करुन टाक त्याप्रमाणे'' असे म्हणून एका कागदावर 35 असे लिहून तीन पाच असे बोलले. त्यावर मी त्यांना म्हणजे पस्तीस हजार असे विचारले असता त्यांनी त्यास ''हा... ऐक एवढच सांगितलं होतं...बरोबर'' असे म्हणून होकार दिला. त्यानंतर किरण राठोड यांनी ''आता यातले दहा तिला देवुन टाक, पंचवीस मला दे संपला विषय'' असे सांगीतले. त्यावर मी त्यांना साहेब काय तरी कमी करा असे सांगीतले असता, त्यांनी ''यांना पाच देवुन टाक आणी बाकीचे मला पंचवीस देवुन टाक'' असे म्हणून किरण राठोड यांनी त्यांच्याकरीता 25,000/- रू व तलाठी चैत्राली कुटे यांचेकरीता 5000/- रू लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेसमोर मॅडमसोबत कन्फर्म करण्यास सांगीतले. त्यानंतर किरण राठोड यांनी त्यांच्या मोबाईल वरून तलाठी चैत्राली कुटे यांना फोन करून त्यांच्या केबीनमध्ये बोलावून घेतले व चैत्राली कुटे यांना उद्देशुन ''ऐकुन घे तुला हे पाच हजार आणुन देईल'' असे म्हणाले. त्यावर चैत्राली कुटे यांनी ''हं'' म्हणून त्यांस होकार देवून माझेकडून पाच हजार रूपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यावर मी त्यांना सदरच्या कामासाठी फी वैगेरे काही असते का असे विचारले असता त्यांनी ''नाय फि वगैरे काही नाय'' असे सांगीतले. त्यानंतर मी त्यांना नंतर देवू कि आता देवू असे विचारले असता त्यांनी मला ''आताच देवून टाक ना'' असे म्हणून कोकण किनारा हॉटेलला येवून फोन करण्यास

सांगीतले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे पडताळणी पथकाजवळ परत आलो. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. दयानंद गावडे यांनी सदरच्या भेटीदरम्यान व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषण दो[redacted] पंचांसमक्ष ऐकले असता, त्यामध्ये मंडळ अधिकारी किरण राठोड यांनी माझे कामाच्या अनुषंगाने त्यांच्याकरीता 25,000/- रू व तलाठी चैत्राली कुटे यांच्याकरीता 5000/- रू लाचेची मागणी करून मागणी केलेली लाचेची रक्कम थोडया वेळाने वाडा-भिवंडी रोडवरील हॉटेल कोकण किनारा येथे घेवून येण्यास सांगीतल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांनी लागलीच सापळा पुर्व कार्यवाही पुर्ण करण्याचा निर्णय घेतला व मी दिलेल्या 500/- रू दराच्या 60 नोटा असे एकुण 30,000/- रू रक्कमेवर शासकीय वाहनामध्ये सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण केली. व आंथ्रासीन पावडर लावलेल्या रक्कमेपैकी किरण राठोड यांना देण्यासाठीचे 25,000/- रू माझे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये व चैत्राली कुटे यांना देण्यासाठीचे 5000/- रू माझे पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी मंडळ अधिकारी किरण राठोड यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर माझे डोक्यावरून वारंवार हात फिरवून लाचेची रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्यास सांगीतले. त्यानंतर माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 01 असे माझेकडील दुचाकीने हॉटेल कोकण किनारा च्या दिशेने निघालो त्यावेळी सापळा पथक हे माझे मागोमाग शासकीय वाहनाने हॉटेल कोकण किनारा हॉटेल च्या परीसरात येवून कोणास संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहीले. मी सदर ठिकाणी पोहचल्यानंतर मी माझे मोबाईल नंबरवरून मंडळ अधिकारी किरण राठोड यांच्या मोबाईल नंबरवर व्हॉटस् अँप द्वारे फोन करून हॉटेलच्या बाहेर थांबल्याचे सांगीतले असता, त्यांनी दहा मिनिटात येतो असे सांगीतले. त्यानंतर ते थोडया वेळाने हॉटेलच्या बाहेर आले व त्यांनी मला ''ये ना, गाडीत बसु....चैत्राली वाट बघतेय वाटतय तुझी'' असे म्हणून त्यांच्या चारचाकी गाडीमध्ये (मारूती सुझुकी स्विप्ट डिझायर) बसण्यास सांगून ते गाडीच्या ड्रायव्हींग सिटवर बसले.त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी सदर गाडीच्या आजुबाजुला माझेवर लक्ष ठेवून थांबून राहीले. त्यानंतर मी सदर गाडीच्या ड्रायव्हर सिटच्या बाजुच्या सिटवर बसलो. तेंव्हा त्यांनी मला ''बोल चल.... किती आहे'' असे विचारले असता.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Suresh Dinkar Kadam(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

मी माझे शर्टच्या खिशातील लाचेची रक्कम काढून त्यांच्याकडे दिली व त्यांना पंचवीस हजार आहेत असे सांगीतले त्यावर त्यांनी ''पन्नास नोटा आहेत?'' असे विचारले त्यावर मी त्यांना मोजून घ्या असे म्हटले. तेंव्हा त्यांनी ''तुझ्यावर आहे विश्वास'' असे म्हणून लाचेची रक्कमेतील थोडया नोटा मोजून त्यांनी लाचेची रक्कम त्यांच्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर त्यांनी मला ''त्या बाईला, त्या बाईला पाच देवुन टाक'' असे सांगीतले. त्यानंतर मी लाचेची रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा माझे डोक्यावरून हात फिरवत गाडीच्या खाली उतरलो. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी मंडळ अधिकारी किरण राठोड यांना रंगेहाथ पकडले. त्यावेळी पोहवा/सुतार यांनी माझे अंगावरील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद करून त्यांच्या ताब्यात ठेवला. त्यानंतर सदरच्या चारचाकी वाहनामध्ये किरण राठोड यांची तपासणी चालू असताना मी कारच्या बाहेर थांबून होतो. त्यानंतर थोडयाच वेळात तपासणी पुर्ण झाल्यानंतर पंच नं. 1 हे कारच्या बाहेर येवून माझे दुचाकीवर बसले. त्यावेळी मला तलाठी चैत्राली कुटे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी जायचे आहे असे वाटल्यामुळे मी अनावधानाने माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर न लावता तलाठी चैत्राली कुटे यांना उर्वरीत 5000/- रू लाचेची रक्कम देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाच्या दिशेने पंच नं. 1 निघून तलाठी चैत्राली कुटे यांच्या केबीनमध्ये गेलो. त्यावेळी सापळा पथक माझे मागोमाग येवून तलाठी कार्यालय, कोने, ता.वाडा च्या परीसरात थांबून होते. त्यावेळी मी तलाठी चैत्राली कुटे यांना भेटलो असता, त्यांनी मला ''राठोड साहेबांनी सांगीतलेलं त्याचं काय केलसं'' असे म्हणून लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली त्यावेळी मी माझे पॅन्टच्या खिशातील 5000/- रू लाचेची रक्कम काढून त्यांच्यासमोर धरली असता, त्यांनी त्यांच्या टेबलचा डाव्या बाजुचा ड्रॉव्हर उघडून त्यामध्ये लाचेची रक्कम ठेवण्यास इशा-याने सांगीतले. त्याप्रमाणे मी लाचेची रक्कम सदरच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवून दिली. व कार्यालयाच्या दरवाजात येवून लाचेची रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील मपोहवा/मांजरेकर यांनी तलाठी चैत्राली कुटे यांना ताब्यात घेतले. तसा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दिनांक 30/01/2024 रोजी किरण शंकर राठोड, मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, कोने, ता.वाडा जि.पालघर यांनी माझा चुलत भाऊ कपिल गोतारणे व माझी चुलत बहीण संजना पाटील हिने केलेल्या नावातील दुरूस्तीच्या अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही पुर्ण करून अहवाल सादर करण्यासाठी तसेच तलाठी सजा कोने, ता.वाडा यांचेकडे माझे वडीलांनी 7/12 उता-यावर फेरफार नोंदीसाठी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने फेरफार मंजूर करण्यासाठी 25,000/- रू लाचेच्या रक्कमेची मागणी करून ती हॉटेल कोकण किनारा, वाडा-भिवंडी रोड, वाडा, जि.पालघर येथे स्विकारली. व चैत्राली किशोर कुटे, तलाठी, तलाठी सजा, कोने, ता.वाडा, जि.पालघर यांनी माझे वडीलांनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आमच्या वडीलोपार्जीत जमीनीच्या 7/12 उता-यावरून माझी मयत आजी कै.गिरजय गोतारणे हिचे नाव कमी करण्यासाठी तसेच माझे मयत आजोबा कै.नाशिक पाटील यांचे नाव 7/12 उता-यावरून कमी करून त्याजागी त्यांच्या वारसांची नावे लावण्यासाठी 5000/- रू लाचेच्या रक्कमेची मागणी करून ती तलाठी सजा, कोने, ता.वाडा या कार्यालयात स्विकारली म्हणून माझी त्यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
वाडा पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Suresh Dinkar Kad
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**